

# कनानवरील विजय


एड्रियन एबेन्स
केविन ज. मुलिन्स्

# कनान वरील विजय

एड्रियन एबेन्स &  केविन ज.  मुलिन्स्

fatheroflove.info

May, 2025

या पुस्तकाचा मराठी अनुवाद भाऊ जोएल एलिझाबेथ सालवी यांनी केला आहे आणि पुस्तकाचे पुनर्वाचन ताई वोईलेट डिसोझा यांनी केले आहे.

# सामग्री

वास्तविकतेचा सामना........................................................................................ 4

सर्वांना तोंड द्यावा लागणारा एक गंभीर प्रश्न........................................................5

सैतानाकडून देवाबद्दलची फसवी मांडणी................................................................ 7

कनान घेण्याची देवाची मूळ योजना.......................................................................9

इस्राएलाची देवाबद्दलची भीती........................................................................... 10

अमालेकसोबतचा एक महत्त्वाचा क्षण.................................................................11

वारशाने मिळालेली तलवार.................................................................................13

परमेश्वराने सांगितले ते सर्व आम्ही करू..............................................................21

चाळीस वर्षांनंतर......................................................................................................22

मोशेने आज्ञा न पाळता खडकावर वार केला.........................................................25

इस्राएल ने प्रतिज्ञा घेतली.....................................................................................26

देव इस्राएलला जे हवे ते देत आहे......................................................................... 27

दहशतीच्या मूर्तीचे प्रकाशन...................................................................................30

दया न दाखवता न्याय.............................................................................................32

वैभवाची झलक.......................................................................................................34

ख्रिस्ताच्या प्रकाशात देवाला पाहणे.......................................................................35

## वास्तविकतेचा सामना

अनुवाद २:३४ त्या वेळी आपण त्याची सर्व नगरे घेतली आणि प्रत्येक नगराचा, त्यांतील पुरुष, स्त्रिया व मुलेबाळे ह्यांच्यासह समूळ नाश केला; आपण त्यांतला कोणीही शिल्लक ठेवला नाही;

अशा वचनांवर नजर गेल्यावर मन सुन्न होतं आणि आत्म्याला एक वेगळाच भय आणि धक्का बसतो. काही लोक ह्याला लढणाऱ्या पुरुषांचा वध "युद्धाची अपरिहार्यता" म्हणून समजून घेतात, पण एका इस्राएली सैनिकाने एका निरागस लहान मुलाला तलवारीवर मेलेलं पाहणं, ही कल्पनाच असह्य वाटते.

माझ्यासाठी तरी ही गोष्ट अंगावर शहारे आणते – एक प्रकारची खोल चीड आणि अतिशय वेदना निर्माण होते. आणि या सगळ्यात अधिक त्रासदायक बाब ही आहे की बायबल या गोष्टींना केवळ मान्यता देत नाही, तर काही ठिकाणी त्या करण्याची आज्ञाही देतो.

अनुवाद ७:२ आणि तुझा देव परमेश्वर त्यांना तुझ्या हवाली करील व तू त्यांचा पराभव करशील, तेव्हा त्यांचा समूळ नाश कर; त्यांच्याशी करारमदार करू नकोस व त्यांच्यावर दया करू नकोस.

यहोशवा ११:१२: परमेश्वराचा सेवक मोशे ह्याच्या आज्ञेप्रमाणे यहोशवाने त्या राजांची सर्व नगरे सर्व राजांसह हस्तगत करून त्यांना तलवारीने ठार मारले व त्यांचा समूळ नाश केला.

यहोशवा १०:४० ह्या प्रकारे यहोशवाने त्या सर्व देशाचा म्हणजे डोंगराळ प्रदेश, नेगेब, तळवट व उतरण ह्यांतील सर्व प्रांत आणि त्यांचे राजे ह्यांचा धुव्वा उडवला; कोणालाही जिवंत राहू दिले नाही; इस्राएलाचा देव परमेश्वर ह्याने आज्ञा केल्याप्रमाणे सर्व प्राण्यांचा त्याने समूळ नाश केला.

काही अभ्यासक म्हणतात की "पूर्णतः नष्ट करणे" या शब्दाचा नेहमीचा अर्थ माणसांचा पूर्ण संहार असा नसतो. काही वेळा यालाच 'बॅन' म्हणतात – म्हणजे त्या वस्तू किंवा लोकांना देवासाठी वेगळं ठेऊन त्याग करणं. पण जर खरोखर त्या लोकांचा संपूर्ण नाश झाला असता, तर मग देवाने इस्राएलला हे का सांगितलं असतं की, "त्यांच्याशी विवाह करू नका"?

अनुवाद ७:२–४ आणि तुझा देव परमेश्वर त्यांना तुझ्या हवाली करील व तू त्यांचा पराभव करशील, तेव्हा त्यांचा समूळ नाश कर; त्यांच्याशी करारमदार करू नकोस व त्यांच्यावर दया करू नकोस. त्यांच्याशी सोयरीक करू नकोस; आपल्या मुली त्यांच्या

मुलांना देऊ नकोस व त्यांच्या मुली आपल्या मुलांना करू नकोस; कारण ते लोक तुझ्या मुलाला माझ्यापासून बहकवतील; आणि अन्य देवांची सेवा करायला लावतील. त्यामुळे तुमच्यावर परमेश्वराचा कोप भडकेल व तो तात्काळ तुमचा नाश करील.

ही विसंगती यामुळे वाटते की इस्राएल जेव्हा एखाद्या शहरावर हल्ला करायचा, तेव्हा आधी त्यांच्याशी शांततेचा प्रस्ताव द्यायचा. जर त्या शहराने शांती स्वीकारली, तर त्यांना कर देणारे म्हणून स्वीकारायचं आणि त्यांच्या मूर्तीपूजेला पूर्णपणे संपवायचं.

अनुवाद २०:१०–११ युद्ध करायला तू एखाद्या नगरावर स्वारी करशील तेव्हा त्याच्याशी तहाचे बोलणे करून पाहा. त्या नगराने तहाचे बोलणे कबूल करून वेस उघडली तर त्या नगरात जे लोक सापडतील ते तुझे वेठबिगार करणारे व दास होतील.

अनुवाद ७:५ त्या लोकांशी तुम्ही अशा प्रकारे वागावे : त्यांच्या वेद्या पाडून टाका, त्यांचे स्तंभ फोडून टाका, त्यांच्या अशेरा मूर्ती तोडून टाका आणि त्यांच्या कोरीव मूर्ती अग्नीत जाळून टाका.

पण हे सगळं समजून घेतलं, तरीही हे ख्रिस्ताच्या शिकवणींपासून खूप दूर वाटतं – कारण ख्रिस्ताचा जीव वाचवण्यावर भर आहे, नष्ट करण्यावर नव्हे.

मत्तय २६:५२: तेव्हा येशू त्याला म्हणाला, “तुझी तलवार परत जागच्या जागी घाल, कारण तलवार धरणारे सर्व जण तलवारीने नाश पावतील.

लूक ९:५४–५६ तेव्हा त्याचे शिष्य याकोब व योहान हे पाहून म्हणाले, “हे प्रभू, एलीयाने केले होते तसेच आकाशांतून अग्नीने पडून त्याचा नाश करावा म्हणून आम्ही आज्ञा करावी, अशी तुझी इच्छा आहे काय?” परंतु त्याने वळून त्यांना धमकावले आणि म्हटले, “तुम्ही कोणत्या आत्म्याचे आहात हे तुम्हास ठाऊक नाही; कारण मनुष्याचा पुत्र मनुष्यांच्या जीवाचा नाश करायला नाही, तर त्यांना तारायला आला आहे.” मग ते दुसऱ्या गावाला गेले.

## सर्वांना तोंड द्यावा लागणारा एक गंभीर प्रश्न

देवाच्या स्वभावाला समजून घेणे हे केवळ बुद्धीच्या पातळीवर होणारे एक संघर्ष आहे—हे समजणं काही आश्चर्यकारक नाही. हा संघर्ष याकोबाने देवदूताशी केलेल्या कुस्तीच्या कथेद्वारे अगदी स्पष्ट होते. याकोबाला ज्या व्यक्तीशी तो झगडत होता, त्याची ओळख पटत नव्हती. त्याला वाटलं की हा देवदूत त्याचा शत्रू आहे—त्याला संपवण्यासाठी आलेला आहे. पण खरे तर, तो त्याचा प्रेमळ तारणारा होता—जो त्याला

वाचवण्यासाठी आलेला होता.

उत्पत्ती ३२:२४-३० — याकोब एकटाच मागे राहिला, तेव्हा कोणा पुरुषाने त्याच्याशी पहाट होईपर्यंत झोंबी केली. याकोबावर आपली सरशी होत नाही हे पाहून त्याने त्याच्या जांघेस स्पर्श केला तेव्हा याकोब त्याच्याशी झोंबी करत असता ती उखळली. मग तो म्हणाला, “पहाट होत आहे, मला जाऊ दे.” तो म्हणाला, “तू मला आशीर्वाद दिल्यावाचून मी तुला जाऊ द्यायचा नाही.” त्याने मग त्याला विचारले, “तुझे नाव काय?” तो म्हणाला, “याकोब.” त्यावर तो त्याला म्हणाला, “ह्यापुढे तुला याकोब म्हणणार नाहीत, तर इस्राएल म्हणतील, कारण तू देवाशी व मनुष्यांशी झगडून प्रबळ ठरला आहेस.” मग याकोबाने विचारले, “तुझे नाव काय ते सांग.” तो म्हणाला, “माझे नाव का विचारतोस?” मग त्याने त्याला तेथेच आशीर्वाद दिला. मग याकोबाने त्या ठिकाणाचे नाव पनीएल (देवाचे मुख) असे ठेवले, तो म्हणाला, “कारण मी देवाचे मुख प्रत्यक्ष पाहूनही माझा प्राण वाचला.”

योहान १:१, २, १४, १८ — प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता आणि शब्द देव होता. तोच प्रारंभी देवासह होता. शब्द देही झाला व त्याने आमच्यामध्ये वस्ती केली, आणि आम्ही त्याचा गौरव पाहिला. तो पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचा गौरव असावा असा अनुग्रह व सत्य ह्यांनी परिपूर्ण होता. देवाला कोणीही कधीच पाहिले नाही; जो एकुलता एक जन्मलेला पुत्र देवपित्याच्या उराशी असतो त्याने त्याला प्रकट केले आहे.

याकोबाने देवाला प्रत्यक्ष पाहिले—पण तो देवाचा एकुलता एक पुत्र होता, हे त्याला फक्त झगडून जिंकल्यानंतरच समजले. याकोब त्या संघर्षात टिकून राहिला, याचे एकमेव कारण म्हणजे ख्रिस्ताने त्याला विचारले, "तुझे नाव काय आहे?" याने याकोबाला कबुली द्यायला भाग पाडले. 'याकोब' या नावाचा अर्थ आहे ‘हेराफेरी करणारा’—कारण त्याने आपल्या भावाचा अधिकार चोरला होता आणि आपल्या वडिलांची फसवणूक केली होती. आता मात्र याकोब त्या स्वर्गदूताकडे आशीर्वादासाठी विनवणी करत होता. ख्रिस्ताने याकोबाचा मांडीचा भाग विस्थापित केल्यावर याकोब काहीच करू शकत नव्हता—फक्त आपल्या तारणाऱ्यावर आधार ठेवत राहिला आणि आशीर्वादाची आस लावून राहिला. त्या वेळी याकोबाला समजले की आपला देव सदैव करुणामय आहे—आणि त्याने त्या करुणेवर स्वतःला पूर्णपणे सोपवले. म्हणून ख्रिस्ताने याकोबाचे नाव बदलून 'इस्राएल' ठेवले—याचा अर्थ आहे "विजेता" किंवा "राजासारखा सामर्थ्यशाली".

फक्त तेच लोक ख्रिस्तासारखा आशीर्वाद मिळवतील जे देव करुणामय आहे, यावर ठाम विश्वास ठेवून त्याला चिकटून राहतात. जुन्या करारातील काही गोष्टी आणि येशूच्या नवीन करारातील विधानं यांच्यात एक संघर्ष निर्माण झाल्यासारखा

वाटतो—याच संघर्षामुळे आपल्या मनात सैतानाने पेरलेले बीज अंकुरते—की देव करुणाशून्य आहे. जर आपण आपला स्वर्गीय पिता खरोखर करुणामय आहे हे शिकले नसेल, तर हा विरोधाभास आपल्या तारणाऱ्याशी एक दीर्घ झगडा निर्माण करतात. मनात दडपून ठेवलेली नाराजी या गोष्टी वाचताना उफाळून येते. रिचर्ड डॉकिन्स, स्टीफन फ्राय आणि इतर अशा अनेकांनी हीच कटूता दाखवून दिली आहे—सैतानाने सुरू केलेल्या खोट्याचे तेच फळ आहे. ही एक अशी खोटी प्रतिमा आहे जी देवाला एक क्रूर, मनमानी करणारा हुकूमशहा म्हणून दाखवते—आणि यामुळे अनेक मानवी मनं त्याच्यावर संतापतात आणि शेवटी त्याला नाकारतात. आजकालचे हे 'नास्तिकवादी' देवाला हिंसक, निर्दयी आणि अन्यायी म्हणत जे प्रचार करतात, त्यामुळे अनेक लोक देवावरचा विश्वासच सोडून देतात.

याउलट, काही जण देव करुणामय आहे हे सिद्ध करताना आदामाची पत्नी हवेसारखे वचनामध्ये काहीतरी 'घालतात'. काहीजण 'सर्वच लोक तारण पावतील' असे शिकवणाऱ्या सर्वव्यापक उद्धाराच्या भ्रमात सापडतात. तर काहीजण बायबलाच्या जुन्या कराराला "ते त्यांच्या काळानुसार योग्य ते करत होते" असे उच्च-आलोचनात्मक स्पष्टीकरण देऊन बाजूला सारतात. अशा प्रकारे, बायबलच्या थेट व स्वाभाविक वचनावरील विश्वास ढासळतो—आणि सर्पाने आपल्या फसवेपणाच्या वेटोळ्यात आत्म्याचा श्वास गुदमरतो.

## सैतानाकडून देवाबद्दलची फसवी मांडणी

सैतान सुरुवातीपासूनच देवाच्या स्वभावाबाबत चुकीचे चित्र रंगवत आला आहे.

योहान ८:४३-४४ – तुम्ही माझे बोलणे का समजून घेत नाही? ह्याचे कारण हेच की, तुमच्याने माझे वचन ऐकवत नाही. तुम्ही आपला बाप सैतान ह्यापासून झाला आहात आणि तुमच्या बापाच्या वासनांप्रमाणे करू इच्छिता. तो प्रारंभापासून मनुष्यघातक होता आणि तो सत्यात टिकला नाही; कारण त्याच्यामध्ये सत्य नाही. तो खोटे बोलतो तेव्हा तो स्वतःचे बोलतो; कारण तो लबाड व लबाडीचा बाप आहे.

सैतानाची ही योजना सुरुवातीपासूनच राहिली आहे – देवाच्याच स्वभावाला सैतान आपल्या स्वतःच्या वाईट गुणांनी झाकतो, जेणेकरून लोक देवाला नाकारतील.

१ पेत्र ५:८ – सावध असा, जागे राहा; तुमचा शत्रू सैतान हा गर्जणाऱ्या सिंहासारखा कोणाला गिळावे हे शोधत फिरतो. त्याच्याविरुद्ध विश्वासात दृढ असे उभे राहा; कारण

तुम्हांला माहीत आहे की, जगातील तुमच्या बंधुवर्गाला अशीच दु:खे भोगावी लागत आहेत.

सैतानच नाश आणि संहार करायला शोध घेत असतो. तो आपली सर्व फसवणूक करणारी ताकद वापरतो, जेणेकरून आपण देवाच्या दयाळूपणाला अंध राहू – आणि त्याला एक नाश करणारा आणि अत्याचारी समजू.

यहेज्केल ३६:१६-२१ परमेश्वराचे वचन मला पुन्हा प्राप्त झाले की, “मानवपुत्रा, इस्राएल घराणे देशात वस्ती करून राहिले तेव्हा त्यांनी आपल्या आचाराने व कृतींनी तो देश भ्रष्ट केला; त्यांचा आचार माझ्यासमक्ष ऋतुमती स्त्रीच्या विटाळाप्रमाणे होता. त्यांनी देशात रक्तपात केला व आपल्या मूर्तींनी तो भ्रष्ट केला म्हणून मी देशावर आपल्या संतापाचा वर्षाव केला. मी त्यांची राष्ट्रांमध्ये पांगापांग केली, देशोदेशी त्यांची दाणादाण झाली; त्यांच्या आचाराप्रमाणे व कृतींप्रमाणे मी त्यांचा न्याय केला. ज्या ज्या देशात ते गेले तेथे तेथे त्यांनी माझ्या पवित्र नामास बट्टा लावला; लोक त्यांच्याविषयी म्हणत की, ‘हे परमेश्वराचे लोक आहेत, हे त्याच्या देशातून बाहेर निघाले आहेत.’ परंतु इस्राएल घराणे ज्या ज्या राष्ट्रांत गेले तेथे तेथे त्याने माझ्या पवित्र नामास बट्टा लावला, तेव्हा मी आपल्या नामास जपलो.

जेव्हा देव म्हणतो की “माझं नाव त्यांनी कलंकित केलं,” त्याचा अर्थ असा नाही की त्यांनी देवाचं नाव चुकीने उच्चारलं. बायबलमधील “नाव” म्हणजे व्यक्तीचा स्वभाव. इस्राएल लोकांनी त्यांच्या मूर्तीपूजेने आणि रक्तपाताने देवाच्या स्वभावाला (नावाला) कलंकित केलं.

निर्गम ३३:१८-१९ तो म्हणाला, “कृपा करून मला तुझे तेज दाखव.” तो म्हणाला, “मी आपले सर्व चांगुलपण तुझ्यापुढे चालवीन; तुझ्यासमोर ‘परमेश्वर’ ह्या नावाची मी घोषणा करीन; ज्याच्यावर कृपा करावी असे वाटेल त्याच्यावर मी कृपा करीन आणि ज्याच्यावर दया करावी असे वाटेल त्याच्यावर दया करीन.

देवाचं “नाव” म्हणजे त्याचा स्वभाव – जो त्याच्या चांगुलपणाने, दयाळूपणाने आणि करुणेने प्रकट होतो. देवाची “महिमा” म्हणजे त्याचे पवित्र गुणधर्म – हेच मोशे पाहू इच्छित होता. पण इस्राएल लोक हेच अनुभवू शकले नाहीत आणि जगालाही देवाचा खराखुरा स्वभाव दाखवू शकले नाहीत.

सैतानच मानवजातीला निर्दयतेने, लिंग-वय न पाहता, मारण्यासाठी प्रवृत्त करतो. खरी कसोटी ही आहे – आपण बायबल योग्य रीतीने वाचतो का? त्याचा अर्थ न बदलता, देवाच्या खऱ्या स्वभावाचं प्रकटीकरण करू शकतो का? कधी कधी, आपण खरंच देवाच्या दयेला ओळखू लागलो की, आपल्याला वाटू शकतं की तोच आपला शत्रू आहे –

आपल्याला त्रास देणारा. पण आपण जर देवाच्या दयेवर विश्वास ठेवून चिकटून राहिलो, तर तो आशीर्वाद देईल. माझं ठाम मत आहे की जर एखाद्याला देवाचा स्वभाव समजला नाही, तर सैतान त्याच्यावर विजय मिळवेल – कारण त्याने सत्य शोधायचा प्रयत्नच केला नाही. आपल्याला परमपित्याच्या स्वभावाचं खरं रूप जाणून घ्यावं लागेल – हे अत्यंत आवश्यक आहे, कारण शेवटच्या काळात, जो कोणी देवाच्या खऱ्या स्वभावाला ओळखतो आणि त्यावर विश्वास ठेवतो, त्याच्यावरच शिक्का मारला जाईल. सैतानाने जशी सुरुवात देवाच्या स्वभावाविषयी खोटी प्रतिमा निर्माण करण्याने केली, तशीच शेवटचा संदेशही जगाला कश्याबद्दल असणार आहे? ते म्हणजे देवाच्या प्रेमळ आणि पवित्र स्वभावाचं प्रकटीकरण.

प्रकटीकरण १८:१ – त्यानंतर मी दुसऱ्या एका देवदूताला स्वर्गातून उतरताना पाहिले, त्याला मोठा अधिकार होता; 'आणि त्याच्या तेजाने पृथ्वी प्रकाशित झाली.'

हा देवदूत म्हणजे देवाच्या अंतिम काळातील लोकांचा प्रतिनिधी आहे, जो शेवटचा संदेश जगाला देणार आहे. हे तेज म्हणजे देवाची "महिमा" – म्हणजे त्याचा स्वभाव – आणि हे तेज पृथ्वीवर प्रकाश टाकेल. ही अंतिम वेळ आहे – जगाला देवाच्या प्रेममय स्वभावाचं खरं प्रकटीकरण होणार आहे. आज बरेच लोक त्याच्या स्वभावाचं चुकीचं चित्र रेखाटत आहेत.

यशया ४०:९-१० – सीयोनेस सुवार्ता सांगणारे, उंच डोंगरावर चढ; यरुशलेमेस सुवार्ता सांगणारे, आपला स्वर जोराने उंच कर; कर उंच, भिऊ नकोस; यहूदाच्या नगरांना म्हण, "तुमचा देव पाहा." पाहा, प्रभू परमेश्वर पराक्रम्यासारखा येत आहे; त्याचा भुज त्याचे प्रभुत्व चालवील; पाहा, वेतन त्याच्याजवळ आहे, व प्रतिफळ त्याच्या हाती आहे.

आपण लोकांना सांगायला हवं – "तुमचा देव बघा!" तो जसा आहे तसाच पाहा – "दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोध, दयेचा व सत्याचा सागर, हजारो जणांवर दया करणारा, अन्याय, अपराध व पाप ह्यांची क्षमा करणारा" (निर्गम ३४:६)

## कनान घेण्याची देवाची मूळ योजना

इस्राएलने कनान भूमी ताब्यात घ्यावी यासंदर्भात परमेश्वराने त्यांना कसे मार्गदर्शन केले, ते बघा:

निर्गम २३:२७-३० ज्या ज्या लोकांच्या विरुद्ध तू जाशील त्यांना मी आधीच दहशत घालून त्यांची फसगत करीन. तुझ्या सर्व शत्रूंना पाठ दाखवायला लावीन. मी तुझ्यापुढे

गांधीलमाशा पाठवीन; त्या हिव्वी, कनानी आणि हित्ती ह्यांना तुझ्यापुढून पळायला लावतील. मी त्यांना एका वर्षातच घालवून देईन असे नाही; तसे केले तर देश उजाड होईल आणि वनपशू फार होऊन तुला उपद्रव देतील. तुझी संख्या वाढून तू देशाचा ताबा घेशील तोपर्यंत मी हळूहळू तुझ्यापुढून त्यांना घालवून देईन.

या ठिकाणी कुठेही तलवार वापरण्याचा किंवा युद्ध करायचा उल्लेख नाही. इस्राएलने मिसरमधून सुटका मिळवली होती, आणि त्यांनी पाहिलं की मिसरच्या सैन्याचा नाश झाला, तोही एकाही तलवारीचा वापर न करता – फक्त देवाच्या हस्तक्षेपाने. परमेश्वराने स्पष्टपणे सांगितले की, "मी तुझ्या पुढे गांधीलमाशा पाठवीन, जे हिव्वी, कनानी आणि हित्ती लोकांना हाकलून देतील." त्यांनी कधीही इस्राएलाला सांगितले नाही की "तुम्ही लढाई करा," "हल्ला करा," किंवा कोणत्याही प्रकारचं युद्ध छेडा.

## इस्राएलाची देवाबद्दलची भीती

जेव्हा परमेश्वराने इस्राएलला मिसरातून सोडवले, तेव्हा त्याचा हेतू असा होता की, त्यांनी त्याला ओळखावं, आणि त्याच्यावर विश्वास ठेवायला शिकावं. पण मिसरमध्ये राहणाऱ्या इस्राएली लोकांना एका अत्याचारी वातावरणाचा सतत अनुभव येत होता. हिब्रू मुलांना नदीत फेकून देणं, आणि त्यांना गुलामगिरीतून कठोर शिक्षा दिल्या जाणं — या सगळ्या अनुभवांमुळे अनेक इस्राएलीं लोकांच्या मनात ही धारणा निर्माण झाली होती की, देव हा एक क्रूर स्वभावाचा आहे — जो कधीही त्यांच्याविरुद्ध फिरू शकतो आणि त्यांना मारून टाकू शकतो. ही भीती त्यांच्या बोलण्यात अगदी सुरुवातीपासूनच प्रकट होते:

निर्गम १४:११ ते मोशेला म्हणाले, "मिसरात काय कबरा नव्हत्या म्हणून तू आम्हांला येथे रानात मरायला आणले? आम्हांला तू मिसरातून बाहेर आणले ते काय म्हणून?

ही भीती अगदी ऐदेनच्या बागेपासूनच माणसाच्या मनात आहे — जेव्हा सैतानाने आदामाला असं विश्वास दिला की, 'जर तुम्ही त्या झाडाचं फळ खाल्लं, तर देव स्वतः येऊन तुम्हाला ठार मारेल.' त्यामुळे जेव्हा आदामाने देवाचा आवाज बागेत ऐकला, तेव्हा तो म्हणाला:

उत्पत्ती ३:१० तो म्हणाला, "मी बागेत तुझा आवाज ऐकला, तेव्हा मी नग्न आहे म्हणून भिऊन लपलो."

इस्राएली लोकांनी त्यांच्या मनात असलेली देवाची भीती थेट सांगितली नव्हती, पण त्यांनी ती मोशेवर आरोप करताना अप्रत्यक्षपणे दाखवली. प्रत्यक्षात, मोशेने स्वतःच्या ताकदीने लोकांना बाहेर काढले नव्हते, हे त्यांना माहिती होतं. मात्र, सैतान त्यांच्या मनात सतत हे विचार भरवत होता की, 'देवच तुम्हाला या वाळवंटात मारायला आणत आहे.' आणि लोकांनी हे विचार मान्य केले, कारण त्यांचं देवाच्या खऱ्या स्वभावाविषयीचं समजणं चुकीचं होतं. म्हणूनच ही भीती त्यांच्या मनात अधिकाधिक खोल रुजत गेली:

निर्गम १६:३ इस्राएल लोक त्यांना म्हणू लागले की, "आम्ही मिसर देशात मांसाच्या भांड्याभोवती बसून भरपूर जेवत होतो तेव्हा आम्हांला परमेश्वराच्या हातून मरण आले असते तर पुरवले असते; पण ह्या सर्व समुदायाला उपासाने मारावे म्हणून तुम्ही आम्हांला ह्या रानात आणले आहे."

इस्राएली लोक देवाबद्दलची आपली भीती उघडपणे व्यक्त करतात. ते अगदी असं म्हणतात की, "मिसर देशात परमेश्वराच्या हातूनच मरण आले असते तर बरं झालं असतं," कारण त्यांना सध्याचं उपाशीपणाचं आयुष्य अधिक भयंकर वाटत होतं. त्यामुळे हे स्पष्ट होतं की, त्यांनी देवावर विश्वास ठेवलेला नव्हता आणि सैतानाने त्यांच्या मनाला देवाच्या खऱ्या स्वरूपापासून अंध केलेलं होतं.

## अमालेकसोबतचा एक महत्त्वाचा क्षण

निर्गमाच्या पुढच्याच अध्यायात, इस्राएली लोक देवाविषयीच्या त्यांच्या विकृत कल्पना आणखी उघडपणे व्यक्त करतात:

निर्गम १७:३-४ पण तेथे लोकांना खूप तहान लागली आणि ते कुरकुर करून मोशेला म्हणाले, "आम्हांला, आमच्या मुलांना व आमच्या गुराढोरांना तहानेने मारून टाकायला तू आम्हांला मिसर देशातून बाहेर का आणलेस?" मोशेने परमेश्वराचा धावा करून म्हटले, "ह्या लोकांना मी काय करू? हे तर मला जवळजवळ दगडमार करायला तयार झाले आहेत."

ते सातत्याने तक्रार करत राहिले आणि मोशेवर — आणि त्याच्यामुळे प्रत्यक्षात देवावर — असा आरोप करत राहिले की, तो त्यांना मारून टाकू इच्छितो आहे. त्यांच्या मनात असलेल्या हिंसक देवाच्या मूर्तिपूजक कल्पना आता प्रत्यक्ष हिंसेच्या धमक्यांमध्ये बदलू लागल्या. त्यांनी जेव्हा या खोट्या आणि हिंसक देवाच्या प्रतिमेकडे

पाहायला सुरुवात केली, तेव्हा त्याच प्रतिमेसारखे ते स्वतःही बनू लागले — आणि ज्या मोशेच्या हातून देवाने त्यांना वाचवलं होतं, त्याच्याविरुद्ध ते आता हिंसक कट रचू लागले.

देवाविषयी सततची कुरकुर, तक्रार, आणि अविश्वास यामुळे त्यांनी स्वतःच अशा अवस्थेत प्रवेश केला जिथे देवाने त्यांचे संरक्षण करणे कमी शक्यतेत आले. कारण अशा वागण्यामध्ये त्यांनी सैतानालाच आपला मालक म्हणून निवडलं — आणि सैतान त्यांना नष्ट करण्यासाठी प्रवेश मागू लागला. आपल्याला ही गोष्ट पुढील प्रकारे स्पष्टपणे दिसते — पाण्याविषयीच्या तक्रारी आणि अमालेक्यांचा हल्ला यामध्ये एक थेट संबंध आहे:

निर्गम १७:७-८ मोशेने त्या ठिकाणाचे नाव मस्सा आणि मरीबा असे ठेवले, कारण इस्राएल लोकांनी तेथे कलह केला आणि “परमेश्वर आमच्यामध्ये आहे किंवा नाही” असे म्हणून परमेश्वराची परीक्षा पाहिली. अमालेकाबरोबर युद्ध मग अमालेक येऊन रफीदीम येथे इस्राएल लोकांशी लढू लागला.

त्यांच्या अविश्वासामुळे, त्यांनी स्वतःहून देवाच्या संरक्षणाच्या कुंपणाबाहेरचं ठिकाण निवडलं — आणि त्यामुळे त्यांच्या शत्रूंनी त्यांच्यावर हल्ला केला. देवाने याला परवानगी दिली, कारण त्याच्या लोकांना नम्र व्हायला हवं होतं (आपण असं म्हणू शकतो की त्यांच्या आत्मिक जांघेला त्याला स्पर्श करायचा होता) — आणि याकोबसारखं, अशा संकटाच्या वेळी त्यांनी देवावर पूर्णपणे अवलंबून राहावं, असा त्याचा हेतू होता.

इस्राएल लोकांनी देवाविरुद्ध केलेल्या कुरकुरींनी — त्या म्हणजे देवाशी असलेली त्यांच्या मनातील झगडे आणि संघर्षाद्वारे — सैतानाला दार उघडून दिलं, ज्यामुळे त्याने अमालेक्यांना उठवून त्यांच्यावर हल्ला करवला. जर त्यांनी प्रभू वर विश्वास ठेवला असता, तर हे घडलेच नसते. कारण अशा परिस्थितीत अमालेक्यांना त्यांना स्पर्श करायचीही हिंमत झाली नसती. या घटनेमध्ये अशी कोणतीही नोंद आढळत नाही की इस्राएल लोकांनी देवासमोर त्यांच्या पापांची खंत व्यक्त केली. त्यांनी देवाकडे केवळ एक क्रूर राजा म्हणून पाहिलं — जो त्यांना मारून टाकायला निघाला आहे. त्यांनी पाणी मिळाल्याबद्दल कोणतीही कृतज्ञता दाखवलेली नाही. त्यांनी मोशेची माफी मागितली नाही, ना त्याचे आभार मानले की त्याने त्यांच्यासाठी पाण्याची याचना केली. असा कोणताही उल्लेख नाही. उलट, त्यांनी मोशेला ठार मारण्याची धमकी दिली होती. आपण कल्पना करू शकतो का, की मोशेला हे सगळं ऐकून किती वेदना झाल्या असतील? तो आपलं निवांत आणि शांत वाळवंटातील घर आणि कुटुंब सोडून फक्त या लोकांसाठी देवाच्या बोलण्यावर विश्वास ठेवून परत आला होता —

आणि आता तेच लोक त्याला ठार मारण्याची भाषा करत आहेत. ह्या सगळ्या प्रकारची कृतघ्नता पाहून, त्याला देवासाठी दाखवलेली ही सेवा जणू स्वतःवरच आघात सारखी वाटली असेल. त्याच्यासाठी हा एक मोठा परीक्षेचा क्षण होता. आणि याच मानसिकतेमध्ये असताना, त्याला बातमी मिळते की अमालेक्यांनी हल्ला चढवला आहे — आणि ते दुर्बल लोकांना निवडून निवडून ठार करत आहेत. आता जे घडतं, ते अत्यंत महत्वाचं आहे — कारण ही कृती एका निराशाजनक वातावरणात, दबावाखाली घेतलेला निर्णय होता:

निर्गम १७:९ तेव्हा मोशेने यहोशवाला सांगितले, “आपल्यांतले काही पुरुष निवडून काढ आणि जाऊन अमालेकाशी युद्ध कर; उद्या मी देवाची काठी हाती घेऊन टेकडीच्या माथ्यावर उभा राहीन.”

## वारशाने मिळालेली तलवार

इथे असं कुठेही लिहिलेलं नाही की, “आणि परमेश्वराने मोशेला आज्ञा दिली.” असंही नाही की मोशे पवित्र ठिकाणी गेला आणि त्याने परमेश्वराची विनंती केली. फक्त एवढंच सांगितलं आहे की मोशेने यहोशवाला जाऊन लढायला सांगितलं. मी हा प्रसंग डोळ्यासमोर आणतो—मोशे यहोशवाकडे चालत येतो, आणि तेवढ्यात सगळं काही हळूहळू घडू लागतं आणि माझे विचार वळतात त्या रात्रीकडे, जेव्हा अब्राहामाने आपला पुतण्या लोट याला युद्ध करून सोडवून घेतलं होतं.

अब्राहाम हा सामान्यतः शांततेचा मार्ग अवलंबणारा माणूस होता. उत्पत्ती २० मध्ये आपण पाहतो की अब्राहामाने आपली बायको बहिण असल्याचे सांगितले, जेणेकरून मिसराच्या राजांशी त्याचं काही वाद होणार नाही. उत्पत्ती १३ मध्ये अब्राहामाच्या आणि लोटाच्या मेंढपाळांमध्ये भांडण झाले होते. पण लक्षात घ्या की अब्राहामाने त्यावर शांततामय उपाय सुचवला:

उत्पत्ती १३:८-९ अब्राम लोटाला म्हणाला, “हे पाहा, माझ्यातुझ्यामध्ये, आणि माझे गुराखी व तुझे गुराखी ह्यांच्यामध्ये तंटा नसावा, कारण आपण भाऊबंद आहोत. सर्व देश तुला मोकळा नाही काय? तर माझ्यापासून वेगळा हो, तू डावीकडे गेलास तर मी उजवीकडे जाईन, तू उजवीकडे गेलास तर मी डावीकडे जाईन.”

मात्र, उत्पत्ती १४ मध्ये आपण पाहतो की लोट ज्या भागात राहात होता, तिथे युद्ध झालं आणि त्यात लोट बंदी बनला.

उत्पत्ती १४:१४-१६ आपल्या भाऊबंदांना पाडाव करून नेले हे अब्रामाने ऐकले तेव्हा आपल्या घरी जन्मलेले व लढाईच्या कामात कसलेले तीनशे अठरा दास घेऊन त्याने दानापर्यंत शत्रूंचा पाठलाग केला. त्याने आपल्या दासांच्या टोळ्या करून त्यांच्यावर रात्रीची चाल केली आणि त्यांना मार देऊन दिमिष्काच्या उत्तरेस होबापर्यंत त्यांचा पाठलाग केला. त्याने सगळी मालमत्ता माघारी आणली; त्याप्रमाणेच आपला भाऊबंद लोट, त्याची मालमत्ता, स्त्रिया व लोक माघारी आणले.

पुन्हा, इथेही असं कुठेही लिहिलेलं नाही की “आणि परमेश्वराने अब्राहामाला आज्ञा दिली.” तर मग, परमेश्वराला अब्राहामाचं हे कृत्य आवडलं काय? तसं वाटायला हरकत नाही, कारण परमेश्वराचा याजक मेल्कीसेदेक अब्राहमाला भेटायला आला आणि त्याने त्याला आशीर्वाद दिला. पण हा आशीर्वाद बक्षीस म्हणून होता का, की अब्राहामाच्या मनात निर्माण झालेल्या अस्वस्थ विचारांना दिलासा देण्यासाठी होता? मेल्कीसेदेक “सालेमचा राजा” म्हणून ओळखला जातो—सालेम म्हणजे “शांती.” हे कदाचित “यरुशलेम”चं एक प्राचीन नाव असावं, ज्याचा अर्थ “शांतीचं शहर” असा होतो. तर मग, शांतीचा हा राजा एका हिंसक युद्धासाठी अब्राहामाला आशीर्वाद देईल का? जेव्हा अब्राहामा युद्धासाठी त्या शहरांजवळ पोहोचला, तेव्हा त्याने आधी त्यांच्याशी शांततेचा प्रस्ताव दिला काय? अब्राहामाने त्या भूमीवर रक्त सांडून तिला अपवित्र केलं काय? जर अब्राहामा थोडा अधिक संयमी राहिला असता, तर कदाचित परमेश्वरानेच गांधीलमाश्या पाठवून त्याचे शत्रू हाकलून दिले असते, किंवा स्वर्गदूत पाठवून लोटला वाचवलं असतं—जसं की पुढे उत्पत्ती १८ आणि १९ मध्ये घडलं. एक गोष्ट मात्र नक्की आहे—जेव्हा इब्रीलोकांसपत्र  ११ मध्ये अब्राहामाने विश्वासाने जे काही केलं त्याचा उल्लेख केला जातो, तेव्हा लोटच्या सुटकेबद्दल काहीच सांगितलेलं नाही.

आदामाप्रमाणेच एक विशेष स्थान धारण करणारा अब्राहाम पिढ्यानपिढ्यांच्या वर्तनावर प्रभाव टाकणारा एक प्रवाह तयार करतो. अब्राहामाने जेव्हा तलवार उचलली, तेव्हा त्याचा परिणाम म्हणजे त्याच्या संततीवर एका भयानक अंधकार पसरले. त्या भयानक रात्री अब्राहाम ह्याने स्वतः त्याचा स्वाद घेतला, कारण भविष्यकाळाबद्दल त्याच्या मनात भीती निर्माण झाली होती – विशेषतः जेव्हा त्याने स्वतःच्या हातात तलवार घेतली.

उत्पत्ति १५:१२: सूर्यास्ताच्या सुमारास अब्रामाला गाढ निद्रा लागली तेव्हा घोर भीती, निबिड अंधकार त्याच्यावर पडला.

एलियाने जेव्हा बालच्या संदेष्ट्यांना तलवारीने ठार मारले, तेव्हा त्याच्याही मनात अपराध निर्माण झाला, हे लक्षात घ्या:

१ राजे १९:१–४: एलीयाने काय काय केले, तसेच त्याने सर्व संदेष्टे तलवारीने कसे वधले हे सगळे अहाबाने ईजबेलीला कळवले. तेव्हा ईजबेलीने जासूद पाठवून एलीयाला बजावले की, “संदेष्ट्यांच्या जिवाच्या गतीसारखी तुझ्या जिवाची गती उद्या ह्याच वेळी केली नाही तर देव माझे तसेच व त्याहूनही अधिक करोत.” हे ऐकून एलीया जीव घेऊन पळाला; तो यहूदातील बैर-शेबा येथे आला व तेथे त्याने आपल्या चाकराला ठेवले. तो स्वतः रानात एक दिवसाची मजल चालून जाऊन एका रतामाच्या झुडपाखाली जाऊन बसला; आपला प्राण जाईल तर बरे असे वाटून तो म्हणाला, “हे परमेश्वरा, आता पुरे झाले, माझा अंत कर; मी आपल्या वाडवडिलांहून काही चांगला नाही.”

इब्रीलोकांसपत्र पुस्तकाच्या सातव्या अध्यायात आपण पाहतो की येशू, जो शांतीचा अधिपती आहे, तो मेल्कीसेदेकाच्या गणनेनुसार महायाजक आहे. येशूने पेत्राने तलवार वापरल्याबद्दल त्याला फटकारले होते. पेत्र आणि इतरांनी येशूच्या या शब्दांचा चुकीचा अर्थ लावला होता: त्याने त्यांना म्हटले, “पण आता तर ज्याच्याजवळ पिशवी आहे त्याने ती घ्यावी; तसेच झोळीही घ्यावी आणि ज्याच्याजवळ तलवार नाही त्याने आपले वस्त्र विकून ती विकत घ्यावी. (लूक २२:३६) पण त्यांनी येशूचे हे शब्द शाब्दिक तलवारीबद्दल आहेत असे समजून घेतले. (MARVBSI) लूक २२:३८ मध्ये लिहिलं आहे: ते म्हणाले, “प्रभूजी पाहा, येथे दोन तलवारी आहेत.” तो त्यांना म्हणाला, “पुरे.” (IRVMAR) मध्ये: "“तेवढे पुरे!”" असे लिहिले आहे. जेव्हा वरवर पाहिलं जातं, तेव्हा वाटू शकतं की येशूने त्यांच्या तलवार घेण्यास मान्यता दिली. पण जेव्हा पुढे जे घडते ते पाहिल्यावर त्याचा खरा दृष्टिकोन स्पष्ट होतो:

लूक २२:४९-५१ *(IRVMAR):* त्याच्याभोवती जे होते ते काय होणार हे ओळखून त्यास म्हणाले, “प्रभू, आम्ही तलवार चालवावी काय?” त्यांच्यापैकी एकाने महायाजकाच्या नोकरावर वार केला आणि त्याचा उजवा कान कापला. येशूने उत्तर दिले, “हे पुरेसे असू द्या.” आणि त्याने त्याच्या कानाला स्पर्श केला व त्यास बरे केले.

मत्तय २६:५२: तेव्हा येशू त्याला म्हणाला, “तुझी तलवार परत जागच्या जागी घाल, कारण तलवार धरणारे सर्व जण तलवारीने नाश पावतील.

'मेल्कीसेदेक' या नावाचा अर्थ आहे 'शांतीचा राजा'. योहानाने येशूला एका घोड्यावर स्वप्नात पाहिलं आणि लिहिलं: "तो नीतीने न्यायनिवाडा करतो' व लढतो." (प्रकटीकरण १९:११) येशू नीतीने युद्ध कसं करतो? हिंसाचाराने नाही, तर त्याच्या शब्दांनी:

योहान १२:४७-४८: आणि जो कोणी माझी वचने ऐकतो पण ती पाळत नाही त्याचा न्याय मी करत नाही; कारण मी जगाचा न्याय करण्यासाठी नव्हे, तर जगाचे तारण करण्यासाठी आलो आहे. जो माझा अव्हेर करतो व माझ्या वचनांचा स्वीकार करत नाही त्याचा न्याय करणारे कोणी आहे; जे वचन मी सांगितले, तेच शेवटल्या दिवशी त्याचा न्याय करील.

देव ज्या युद्धात सामील आहे ते म्हणजे एक शब्दयुद्ध – शैतानाच्या शब्दांविरुद्ध देवाचे शब्द. देव कधीही हिंसाचाराने युद्ध करत नाही. तो जेव्हा नीतीने न्याय करतो तेव्हा ते कधीही इतराला इजा देणे किंवा त्याचा नाश करणे असे नसते:

नीतिसूत्रे ११:४-६: क्रोधाच्या समयी धन उपयोगी पडत नाही, पण नीतिमत्ता मृत्यूपासून सोडवते. सात्त्विकाची नीतिमत्ता त्याचा मार्ग नीट करते, पण दुर्जन आपल्या दुष्टतेने पतन पावेल. सरळांची नीतिमत्ता त्यांना सोडवील, पण जे कपटाने वागतात ते आपल्या दुष्कृतीनेच बद्ध होतील.

नीतिसूत्रे १२:२८: न्याय्यत्वाच्या मार्गात जीवन आहे; त्याच्या वाटेत मरण नाही.

देव युद्धात आपले शत्रू कसे जिंकतो? तो त्यांना शिक्षा देऊन, छळ करून किंवा ठार मारून नाही, तर त्यांना आपले मित्र बनवून विजय मिळवतो. धार्मिकता माणसाचा नाश करत नाही; ती "जुन्या मनुष्याचा" मृत्यू घडवते (स्तोत्र ३२:३९; रोमकरांस ६:६-११) आणि "मृत्यूपासून वाचवते." देव वाईटावर विजय मिळवतो आणि सूड घेतो, पण नेहमी त्यांचे चांगले करून.

रोमकरांस १२:१७-२१ वाइटाबद्दल वाईट अशी कोणाची फेड करू नका. सर्व माणसांच्या दृष्टीने जे सात्त्विक ते करण्याकडे लक्ष ठेवा. शक्य तर सर्व माणसांबरोबर तुमच्याकडून होईल तितके शांतीने राहा. प्रिय जनहो, सूड उगवू नका, तर देवाच्या क्रोधाला वाट द्या; कारण असा शास्त्रलेख आहे की, "सूड घेणे माझ्याकडे आहे, मी फेड करीन," असे प्रभू म्हणतो. उलटपक्षी, "तुझा शत्रू भुकेला असल्यास त्याला खायला दे; तान्हेला असल्यास त्याला प्यायला दे; कारण असे केल्याने तू त्याच्या मस्तकावर निखाऱ्यांची रास करशील." वाइटाने जिंकला जाऊ नकोस, तर बऱ्याने वाइटाला जिंक.

देव जेव्हा धार्मिकतेनं न्याय करतो, तेव्हा त्यातून युद्ध नव्हे, तर शांती निर्माण होते.

यशया २:४: तो राष्ट्रांचा न्यायनिवाडा करील, देशोदेशींच्या बहुत लोकांचा इन्साफ करील; तेव्हा ते आपल्या तलवारी मोडून त्यांचे फाळ करतील, आपल्या भाल्यांच्या कोयत्या करतील; ह्यापुढे एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर तलवार उचलणार नाही; ते इतःपर युद्धकला शिकणार नाहीत.

मग माझं मन शेखेम या गावाकडे वळतं — जिथे अब्राहामाचे नातू, लेवी आणि शिमोन, ह्यांच्या बहीणीवर बलात्कार झाल्यामुळे ते सूड घेण्यासाठी तलवार उचलतात. त्यांनी धूर्तपणे शांततेचा करार केला – जर हमोर, त्याचा मुलगा शेखेम आणि त्यांच्या घरातील सर्व पुरुष सुंता करवून घेतील, तर त्यांना इब्री कन्यांशी विवाह करता येईल. दोन्ही घराणे एकत्र येतील, आणि एक कुटुंब बनतील.

उत्पत्ति ३४:२५-२९ तिसऱ्या दिवशी असे झाले की, ते बेजार असता याकोबाचे दोन मुलगे, म्हणजे दीनेचे भाऊ शिमोन व लेवी ह्यांनी आपापली तलवार हाती घेऊन त्या नगरावर अचानक छापा घातला आणि तेथील सर्व पुरुषांची कत्तल केली. हमोर व त्याचा मुलगा शखेम ह्यांचाही तलवारीने वध करून ते दीनेस शखेमाच्या घरातून काढून घेऊन गेले. मग याकोबाच्या मुलांनी त्या वध केलेल्यांवरून जाऊन ते नगर लुटले, कारण त्यांनी त्यांची बहीण दीना हिला भ्रष्ट केले होते. त्यांची शेरडेमेंढरे, गाईबैल, गाढवे आणि त्या नगरातले व शेतातले होते नव्हते ते सारे त्यांनी घेतले. त्यांचे अवघे धन, त्यांची सर्व मुलेबाळे व स्त्रिया आणि त्यांच्या घरात जे काही सापडले ते सगळे हस्तगत करून त्यांनी लुटले.

अब्राहामाने आपल्या पुतण्याला वाचवण्यासाठी केलेल्या कृतीचे बीज, पुढे लेवी आणि शिमोन यांच्या जीवनात अधिक तीव्र स्वरूपात प्रकट झाले. त्यांच्या इतर भावांनी शेखेमच्या लोकांना सुंता करून घेण्याची फसवी अट घालून जी फसवणूक केली होती, तीही यात सामील होती. खरंच, याकोब असा शोक व्यक्त करू शकला असता की त्याचे वंशज कनान्यांच्या आणि परिज्ज्यांच्या नजरेत कुप्रसिद्ध होतील, आणि त्यांनी एकदा तलवार उचलली असल्यामुळे, ती तलवार त्यांचा पाठलाग पिढ्यानपिढ्या करत राहील. याकोबाचे हे शब्द पाहा:

उत्पत्ति ३४:३० तेव्हा शिमोन व लेवी ह्यांना याकोब म्हणाला, “ह्या देशाचे रहिवासी कनानी व परिज्जी ह्यांना माझा वीट येईल असे करून तुम्ही मला संकटात घातले आहे; माझे लोक मूठभर आहेत, म्हणून ते एकजूट करून माझ्यावर येतील व माझी कत्तल करतील, आणि माझा व माझ्या घराण्याचा फडशा उडवतील.”

जेव्हा आपल्या पूर्वजाने आपल्या बहिणीसाठी उभं राहून शेखेमच्या लोकांना ठार मारलं, त्या घटनेची वारंवार सांगितलेली कथा, ह्याचा लेवीच्या संततीवर काही परिणाम झाला असेल काय? लेवीच्या काही मुलांना त्यांच्या वडिलांनी बहिणीचं संरक्षण केल्याचा अभिमान वाटण्याचा मोह झाला असेल काय? शत्रूंवर तलवार चालवणं हे "स्वसंरक्षण" म्हणून योग्यच होतं, असं शैतान त्यांच्या मनात सुचवत नसेल काय? "आपल्या पूर्वजाने थंड डोक्याने खून केला" आणि त्यामुळे त्याची लाज आपण पिढ्यानपिढ्या वाहत आहोत — हे मान्य करणं कठीण आहे. त्यामुळे हे सगळं

स्वसंरक्षणासाठी केलं गेलं होतं, ही सोपी व्याख्या स्वीकारणं अधिक सोयीचं वाटलं नसेल काय?

हा सगळा इतिहास आता मोशेच्या पावलांमधून यहोशवाच्या दिशेने चालत आहे. माझं मन मोशेच्या आयुष्यातील एका आधीच्या प्रसंगाकडे वळतं. त्याच प्रकारचा एक मोह त्याच्यासमोर आला होता — जेव्हा त्याने एका मिसरी सैनिकाला आपल्या एका इब्री नातेवाईकाला मारहाण करताना पाहिलं. तेव्हा त्याच्या वडील लेवीसारखाच संताप त्याच्यात उसळून आला. मोशेने त्या मिसरी सैनिकाला ठार मारलं आणि आपला राग शमवला. पण त्याच्याकडून ही कृती घाईत घडली. त्याला वाटलं की देवाने त्याला आपल्या लोकांना मुक्त करणारा एक विजयी योद्धा म्हणून उभं केलं आहे. पण परमेश्वराने आपलं कार्य कधीही बळजबरीने किंवा युद्धाद्वारे पूर्ण करायचं ठरवलं नव्हतं.

जखऱ्या ४:६ – तेव्हा त्याने मला उत्तर केले, "जरूब्बाबेलास परमेश्वराचे हे वचन आहे : बलाने नव्हे, पराक्रमाने नव्हे, तर माझ्या आत्म्याने कार्यसिद्धी होईल असे सेनाधीश परमेश्वर म्हणतो.

मोशेला वाळवंटात गेलेले चाळीस वर्षे स्वतःच्या निर्णयांद्वारे आपल्या लोकांचं संरक्षण करण्याच्या मोहातून मुक्त करत होते काय? मोशेला हे समजलं होतं का की अमालेकाने आधीच थकलेल्या लोकांवर हल्ला करून त्यांना ठार केलं होतं? मोशेच्या मृत्यूपूर्वी त्याने हे आठवून सांगितलं:

अनुवाद २५:१७-१९ – तुम्ही मिसर देशातून बाहेर निघालात तेव्हा वाटेने अमालेक तुमच्याशी कसा वागला ह्याची आठवण ठेवा; वाटेत तुला गाठून तू थकला भागलेला असताना त्याने देवाला न भिता दमून मागे पडलेल्या तुझ्या सगळ्या लोकांवर हल्ला चढवून त्यांना ठार मारले. म्हणून तुझा देव परमेश्वर जो देश तुला वतन म्हणून देत आहे त्यात चोहोकडल्या सर्व शत्रूंपासून तुझा देव परमेश्वर ह्याने तुला विश्राम दिल्यावर अमालेकाची आठवण पृथ्वीतलावरून बुजवून टाक; विसरू नकोस.

हे सगळे शत्रू सैतानाने मुद्दाम आखलेले होतं का, जेणेकरून इस्राएल पुन्हा तलवार उचलतील आणि त्यामुळे इस्राएलाची प्रतिमा जगासमोर वाईट होईल? सैतानाचा हेतू असा होता का की, याच्या माध्यमातून देवाच्या स्वभावाचं चुकीचं चित्र लोकांसमोर येईल? खुद्द इस्राएली लोकांनाच देवाचा खरा स्वभाव समजला नव्हता – त्यामुळे कदाचित त्यांनी तलवार उचलणं, त्यांच्या मनात तयार झालेल्या देवाचं प्रतिबिंब होतं! त्यांना वाटलं असेल की जर हा देव तहान लागल्यावर पाणीही देऊ शकत नाही, तर मग तो अमालेकांच्या हल्ल्यात त्यांचं रक्षण काय करेल?

आपण पाहिलं आहे की देवाचा मूळ हेतू कधीच युद्ध द्वारे वचनबद्ध भूमी मिळवण्याचा नव्हता. मग असं म्हणणं योग्य ठरेल का की, यहोशवाला युद्धासाठी बोलावणं – ही एक अशी कृती होती जी देवाने आदेश दिलेली आणि प्रार्थनेने मागितली नव्हती! इस्राएलला अमालेकांविरुद्ध विजय मिळवण्यासाठी खूप मोठा संघर्ष आणि प्रामाणिक प्रार्थना करावी लागली – यावरून स्पष्ट होतं की ही देवाची इच्छा नव्हती. पण तरीही देवाने त्यांना त्या मार्गावर जाऊ दिलं कारण बहुतेक इस्राएली लोकांचा देवाविषयीचा समजच युद्ध प्रिय, रागीट स्वभावा सारखा होता. जेव्हा सैतानाला मिसरी लोकांना ठार मारण्याची संधी मिळाली, तेव्हा त्याने इस्राएलांना सांगितलं की, "तुमचा देवच हे सगळं करत आहे." (मिसरमधील संकटांविषयी सविस्तर स्पष्टीकरणासाठी 'Calvary in Egypt' हे पुस्तक पाहा.)

एकदा तलवार उचलली की पुन्हा पुन्हा त्याच मार्गावर जाणं सहज शक्य होतं. देवाने

अमालेकाच्या घटनेनंतर पुन्हा त्यांना विनवणी केली की, तो वेगळ्या प्रकारे विजय देऊ शकतो – असा मार्ग ज्यात तलवारीची गरज भासत नाही (निर्गम २३:२७-३०). पण जोवर इस्राएल देवाच्या खऱ्या स्वभावाला समजत नव्हते, तोवर त्यांना वारंवार तलवार वापरण्याचा मोह होणारच.

